PAP

Compliance of 79A procedure

38

2013

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. प्र.अ./४०६३२३/वि.नि./साधा. वि.

**- प रि प त्र क -**

विषय: मुंबई महानगरपालिकेने सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुर्नविकास प्रकल्पाकरीता संबधित उप/सहाय्यक निबंधकाची पूर्व परवानगी घेण्याबाबत.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी क्र. सगृयो २००७/प्र.क्र.५५४/१४-स दि. ३.०१.२००९ द्वारे सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुर्नविकासासाठी निर्देश दिले आहेत. सदर निर्देशामध्ये पुर्नविकास करण्याच्यादृष्टीने मार्गदर्शक नियमावली दिली आहे. (सी ३ ते सी १८) कार्यासन अधिकारी, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग याच्या दि. १९.१०.२०११ च्या शुध्दीपत्रक क्र. सगृयो-२००७/प्र.क्र.५५४/१४-स नुसार स्थानिक प्राधिकरणाने पुनर्विकास प्रकल्पामध्ये संबधित उप/सहाय्यक निबंधकाची पुर्वपरवानगी घ्यावी असे नमुद केले आहे.

या अनुषगाने सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुर्नविकासाचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर करतेवेळी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि. ३.१.२००९ चे निर्देशपत्र क्र. सगृयो/२००७/प्र.क्र. ५५४/१४-स व दि. १९.१० २०११ चे शुध्दिपत्रक क्र. सगृयो/२००७/प्र.क्र. ५५४/१४-स नुसार पारित केलेल्या मार्गदर्शक नियमावलीची पुर्तता केल्याबाबतचे, उप / सहाय्यक निबधक यांचे पुर्वपरवानगीचे प्रमाणपत्र सोबत सादर करणे या परिपत्रकाद्वारे बंधनकारक करण्यात येत आहे.

१९/७/१३
प्रमुख अभियंता
(विकास नियोजन

१५/७/१३
महानगरपालिका आयुक्त